संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान
सुधारीत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः संगाग्रा-२०१९/प्र. क्र. ८७/पापु-१६

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल
लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केट,मंत्रालय,मुंबई- ४०० ००१
दिनांक: - **२३ जुलै, २०१९.**

<u>वाचा :</u>

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. अभियान-१००८/ प्र.क्र.१७७/पापु-१६, दिनांक १५ सप्टेंबर,२००८.
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. अभियान १००९/ प्र.क्र,९१/पापु-१६, दिनांक ३० मे,२००९.
३) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.संगाग्रा-२०१६/ प्र.क्र.७२/पापु-०८, दिनांक ०४ जून,२०१६.
४) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.संगाग्रा-२०१८/ प्र.क्र. ४१/पापु-१६, दिनांक २५ एप्रिल, २०१८.

<u>प्रस्तावना :</u>

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूळ उद्देश, ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्याचा आहे. स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर, उंचावण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणा-या अभियान/कार्यक्रमामध्ये ग्रामस्थांच्या सक्रिय व सातत्यपूर्ण सहभागाच्या माध्यमातून, कार्यक्रमाचा आपलेपणा व महत्त्व पटवून देण्याकरिता, सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाद्वारा दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून " स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) " हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या उद्दिष्टानुसार, राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेसाठी, मोठ्या प्रमाणात बांधकाम करण्यात आलेल्या, वैयक्तिक शौचालयांचा वापर करून, उघड्यावरील शौचास बसण्याच्या प्रवृत्तीत आमूलाग्र बदल करुन, २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार संपुर्ण ग्रामीण महाराष्ट्र एप्रिल २०१८ मध्ये " हागणदारीमुक्त " झाला आहे. वैयक्तिक शौचालयांचा शाश्वत वापर करणे,गावांतील संपूर्ण परिसर, शाळा, अंगणवाडी, शासकीय/ निमशासकीय इमारती, कार्यालये, सहकारी संस्था, सार्वजनिक बाजार, एस. टी. स्टँण्ड, यात्रास्थळे, पर्यटनस्थळे इत्यादी ठिकाणचा परिसर संपूर्णपणे स्वच्छ ठेवणे, तेथे पुरेशा प्रमाणात शौचालये व मुतारींची व्यवस्था निर्माण करून, शाश्वत वापर करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासनाने घेतलेल्या विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावरून, यादृष्टीने भरीव प्रमाणात कार्यवाही सूरू आहे. अशा प्रकारे स्वच्छतेशी व ग्रामविकासाशी निगडीत क्षेत्रामध्ये भरीव काम करणा-या ग्रामपंचायतींना संत गाडगेबाबा ग्राम

स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर पुरस्कार देण्यात येतात.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत,ग्रामपंचायतींची तपासणी करण्याच्या अनुषंगाने, शासन स्तरावरून वेळोवेळी विस्तृत मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल /सुधारणा करून, सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता, मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

१. सन २०१९-२० या वर्षासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

(अ) <u>राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती</u>:-

राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती, मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या सह अध्यक्षतेखाली राहील. या समितीमध्ये १) ग्राम विकास, २) वित्त, ३) शालेय शिक्षण, ४) सार्वजनिक आरोग्य, ५) जलसंधारण, ६) वने, ७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, ८) पर्यावरण ९) नगर विकास विभाग व १०) महिला व बाल विकास विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव हे सदस्य राहतील व अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हे सदस्य सचिव राहतील. आवश्यकता भासल्यास, अन्य विभागाच्या अधिका-यांचा या समितीमध्ये समावेश करण्यात येईल.

या अभियानाची दिनांक १ ऑगष्ट, २०१९ पासून सुरूवात झाल्यानंतर, दिनांक १ ऑगष्ट, २०१९ ते १५ ऑगष्ट, २०१९ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणा-या बैठकीमध्ये, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून, सन २०१९-२० या वर्षासाठी राबविण्यात येणा-या, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येईल. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती, हे समितीमधील उपरोक्त विभागाचे प्रमुख यांना, या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवाहन करतील. तसेच उपरोक्त विभागाचे प्रमुख हे त्यांच्या नियंत्रणाखालील क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांना या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता, सक्रिय सहभाग नोंदविण्याच्या अनुषंगाने निर्देश देतील.

(ब) <u>जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती</u>:-

जिल्हा स्तरावर मा. अध्यक्ष/अध्यक्षा, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती राहील. ज्यामध्ये जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह अध्यक्ष, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत), उप मुख्य कार्यकारी अधिकारी,

(एकात्मिक बाल विकास योजना), कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा), सहाय्यक प्रकल्प अधिकारी (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा आरोग्य अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य राहतील. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), हे सदस्य सचिव राहतील. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे, सरपंच/ग्रामसेवक यांचा या अभियानामध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याकरिता, त्यांना प्रेरित करणे, जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीचे सदस्य सचिव यांनी, अभियानाच्या अनुषंगाने दर दोन महिन्यांनी विविध ग्रामपंचायतीमधील कामांचा आढावा घेणे, यासंदर्भात समितीचे अध्यक्ष संबधितांना निर्देश देतील.

दिनांक १ ऑगष्ट, २०१९ ते १५ ऑगष्ट, २०१९ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणा-या बैठकीमध्ये या अभियानाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येईल.

२. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा व राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती व स्वच्छ जिल्हा परिषद अशा दोन स्पर्धा घेण्यात येतील. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची पूर्वतयारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेकरिता ग्रामपंचायत तपासणीसाठी तयारी, स्पर्धा स्तर व तपासणी कार्यक्रम खालीलप्रमाणे असेल:-

(i) अभियान घोषणा व बैठकांचे आयोजन-(दिनांक १ ऑगष्ट, २०१९ ते १५ ऑगष्ट, २०१९):-

या अभियानाची सुरुवात दिनांक **१ ऑगष्ट, २०१९** पासून करावी. दिनांक १ ऑगष्ट, २०१९ रोजी अभियानाची घोषणा झाल्यानंतर, उपरोक्त परिच्छेद क्रमांक **१ (अ)** व **(ब)** येथे नमूद केल्याप्रमाणे, **मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता)** हे राज्यस्तरावर आणि **मा. अध्यक्ष/अध्यक्षा, जिल्हा परिषद** हे जिल्हास्तरावर बैठका घेऊन, अभियानाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन करतील. उपरोक्त परिच्छेद क्रमांक **१ (अ)** व **(ब)** येथे **राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती व जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीच्या** कार्यकक्षेबाबत विस्तृत विवेचन करण्यात आले आहे.

या कालावधीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनानुसार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्राम विकास अधिकारी, ग्राम विस्तार अधिकारी व सर्व संबधितांची तालुका स्तरावर बैठक आयोजित करावी. सदर बैठकीस, संबंधित मा. खासदार/मा. आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सेवाभावी संस्था, महाविद्यालयाचे प्राध्यापक, स्वातंत्र्य सैनिक इत्यादी मान्यवरांना निमंत्रित करण्यात यावे व सर्वांना अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करावे.

सदर बैठकीमध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी या शासन निर्णयाचे वाचन करून, अभियान/ स्वच्छतेचे महत्व सर्व संबधित उपस्थितांना विषद करून, स्वच्छतेच्या अनुषंगाने जनजागृती करण्याकरिता व या अभियानाची प्रचार प्रसिद्धी करण्याकरिता, सर्वांनी या अभियांनामध्ये सामाजिक बांधिलकीने सहभागी होण्याचे आवाहन करावे.

(ii) <u>ग्रामपंचायत स्तर समिती गठण व कृती कार्यक्रम निश्चिती- दिनांक १६ ऑगष्ट, २०१९ ते ३१ ऑगष्ट, २०१९:-</u>

या कालावधी दरम्यान प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच अभियान सभा घेतील. अभियान यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर, मा. सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे आदेश गट विकास अधिकारी, पंचायत समिती निर्गमित करतील. या समितीमध्ये सर्व संबधित स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी/कर्मचारी सदस्य असतील. या अभियानामध्ये सक्रिय काम करण्यासाठी, समितीच्या बैठकीमध्ये कृती कार्यक्रम ठरविण्यात यावा. शाश्वत आराखडा पूर्ण झाला असल्यास, त्याचा व पूर्ण गावाचा अभ्यास करुन, वैयक्तिक शौचालयाच्या स्थितीबद्दल माहिती एकत्रित करुन, त्याप्रमाणे संपूर्ण स्वच्छतेबाबतच्या बाबी (वैयक्तिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, मासिक पाळी व्यवस्थापन, पाणी पुरवठा आणि परिसर स्वच्छता इ.) कृती कार्यक्रमामध्ये समाविष्ट कराव्यात.

<u>प्रभागस्तर स्पर्धा</u> :-

(iii) <u>" उत्कृष्ट प्रभाग " स्पर्धेकरिता तयारी--दिनांक १ सप्टेंबर, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ :-</u>

या कालावधीमध्ये राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमधील प्रत्येक प्रभाग (Ward) हा "उत्कृष्ट प्रभाग "या स्पर्धेकरिता परिशिष्ट १ मधील निकषाप्रमाणे जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी तयारी करेल. या तयारी दरम्यान गणपती उत्सव व इतर सणांचे औचित्य साधून, या अभियानाचे महत्व जास्तीत जास्त ग्रामस्थांना पटवून देण्याकरिता, स्वच्छता फेरी, चर्चासत्र व इतर सामुहिक कार्यक्रमाचे ग्रामपंचायतीने आयोजन करावे व आयोजित केलेल्या उपक्रमाची नोंद ग्रामपंचायतीच्या दफ्तरी, लेखी स्वरूपात ठेवण्याची कार्यवाही संबधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी करावी.

(iv) <u>" उत्कृष्ट प्रभाग " स्पर्धेचे आयोजन व समिती गठण --दिनांक १ ऑक्टोबर, २०१९ ते २० ऑक्टोबर, २०१९:-</u>

या कालावधीमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीने " उत्कृष्ट प्रभाग " या स्पर्धेचे आयोजन करावे. या स्पर्धेच्या तपासणीकरिता, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक यांच्या अध्यक्षतेखाली तपासणी समिती गठीत करून, त्यामध्ये मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका (माध्यमिक), अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविका (एन.एम.) यांचा सदस्य म्हणून समावेश करावा.

या समितीने सोबतच्या परिशिष्ट १ मधील निकषांप्रमाणे तपासणी करुन, ग्रामपंचायत अंतर्गत उत्कृष्ट प्रभागाची निवड करावी. या स्पर्धेमध्ये निवडलेल्या "उत्कृष्ट प्रभागास " रूपये १०,०००/- (रूपये दहा हजा र फक्त) इतकी पुरस्कार रक्कम, सन्मानचिन्ह व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची स्वाक्षरीचे, प्रभागाच्या नावे असलेले प्रशस्तीपत्रक देण्यात यावे. प्रशस्तीपत्रकाचा नमुना परिशिष्ट ३ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

या प्रक्रियेचे संपूर्ण नियंत्रण व संपुर्ण जबाबदारी जिल्हास्तरावर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांची व तालुका स्तरावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची राहील. " उत्कृष्ट प्रभाग " करिता मिळणा-या पुरस्कार रक्कम रूपये १०,०००/ (रूपये दहा हजार फक्त) चा

विनियोग संबधित ग्रामपंचायतीने पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट प्रभागामधील स्वच्छता विकास कामाकरिता करावा.

v) **" उत्कृष्ट प्रभाग " सत्कार सोहळा -दिनांक २१ ऑक्टोबर, २०१९ ते ३१ ऑक्टोबर,२०१९:-**

या कालावधीमध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी " उत्कृष्ट प्रभाग " स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकावर आलेल्या उत्कृष्ट प्रभागाचा सत्कार सोहळा व पुरस्कार वितरण कार्यक्रम, मा. सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करण्याचे निर्देश प्रत्येक ग्रामपंचायतीला द्यावेत. "उत्कृष्ट प्रभागा " साठीच्या पुरस्काराची रक्कम, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक प्रभागातील सर्व सदस्य यांना एकत्रितपणे सत्कार सोहळ्यामध्ये प्रदान करावे. या कार्यक्रमामध्ये ग्रामपंचायतीमधील, सर्व ग्रामस्थांचा व लोकप्रतिनिधींचा सहभाग सुनिश्चित करावा, जेणेकरून इतर प्रभागामधील ग्रामस्थांना देखील प्रभावी काम करण्यास प्रेरणा मिळेल.

जिल्हा परिषद गट स्तर स्पर्धा :-

vi) **जिल्हा परिषद गट प्राथमिक तपासणी -दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ ते ३० नोव्हेंबर,२०१९:-**

या कालावधीमध्ये जिल्हयातील सर्व जिल्हा परिषद गटातील समाविष्ट ग्रामपंचायतींमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात यावी. सदर गटातील ग्रामपंचायतींच्या तपासणीसाठी, संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी, त्यांच्या स्तरावर खालील प्रमाणे प्रत्येक जिल्हा परिषद गटनिहाय प्राथमिक समित्या गठीत कराव्यात.

जिल्हा परिषद गट स्तर प्राथमिक तपासणी समिती पुढीलप्रमाणे असेल:-

विस्तार अधिकारी	अध्यक्ष
अंगणवाडी पर्यवेक्षक	सदस्य
आरोग्य पर्यवेक्षक	सदस्य
केंद्र प्रमुख (शिक्षण)	सदस्य

उपरोक्त प्रमाणे गठीत केलेल्या प्रत्येक समित्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या जिल्हा परिषद गटातील ग्रामपंचायतींची, सोबतच्या "परिशिष्ट २" मधील निकषानुसार काटेकोरपणे तपासणी करावी व सदर ग्रामपंचायतीमधून सर्वात जास्त गुण प्राप्त करणा-या पहिल्या तीन ग्रामपंचायतींचा मुल्यांकन अहवाल, दिनांक ०१ डिसेंबर २०१९ पूर्वी जिल्हा परिषद गट अंतिम तपासणी समितीकडे सादर करावा. जिल्हा परिषद गट स्तर प्राथमिक तपासणी समिती कडून करण्यात येणारी तपासणी ही चाळणी स्वरूपाची आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा परिषद गट अंतिम तपासणी समितीकडून प्रत्येक जिल्हा परिषद गटामधून प्रथम क्रमांकाच्या ग्रामपंचायतीची अंतिम निवड करण्यात येणार असल्याने, जिल्हा परिषद गट प्राथमिक तपासणी समितीकडून निवडण्यात येणा-या तीनही ग्रामपंचायती ह्या कोणत्याही पुरस्काराकरिता पात्र राहणार नाहीत.

vii) **जिल्हा परिषद गट अंतिम तपासणी दिनांक १ डिसेंबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९:-**

जिल्हा परिषद गट प्राथमिक तपासणी समितीकडून प्राप्त होणा-या ग्रामपंचायतीच्या अहवालाच्या तपासणीअंती, जिल्हा परिषद गटामधून अंतिमत: प्रथम क्रमांकाच्या ग्रामपंचायतींची निवड करण्याकरिता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या स्तरावर संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे **जिल्हा परिषद गट अंतिम तपासणी समिती** गठीत करावी.

गट विकास अधिकारी	अध्यक्ष
तालुका आरोग्य अधिकारी	सदस्य
सहाय्यक गट विकास अधिकारी	सदस्य
बाल विकास प्रकल्प अधिकारी	सदस्य
गट शिक्षणाधिकारी	सदस्य
उप अभियंता (पाणी पुरवठा) पंचायत समिती	सदस्य
विस्तार अधिकारी (पंचायत)	सचिव

जिल्हा परिषद गट प्राथमिक तपासणी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार प्रत्येक जिल्हापरिषद गटामध्ये सर्वात जास्त गुण प्राप्त करणा-या पहिल्या दोन क्रमाकांच्या ग्रामपंचायतींची सोबतच्या **"परिशिष्ट २"** मधील निकषानुसार काटेकोरपणे तपासणी करावी व प्रत्येक जिल्हा परिषद गटामधील प्रथम क्रमांकाच्या ग्रामपंचायतीची अंतिम निवड करून, जिल्हा परिषद गटनिहाय अहवाल दिनांक **३१ डिसेंबर,२०१९** पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करावा.

जिल्हा स्तर स्पर्धा :-

viii) **जिल्हास्तर स्पर्धा तयारी- दिनांक ०१ जानेवारी, २०२० ते १५ जानेवारी, २०२०:-**

या कालावधीत जिल्हा परिषद गट स्पर्धेमधील प्रथम क्रमांकाची ग्रामपंचायत जिल्हास्तर स्पर्धेसाठी या शासन निर्णयासोबतच्या " परिशिष्ट- २" मध्ये नमूद केलेल्या निकषाप्रमाणे तयारी करेल.

ix) **जिल्हा स्तर तपासणी- दिनांक १६ जानेवारी, २०२० ते २९ फेब्रुवारी, २०२० :-**

जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गटामधील, प्रथम क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतीची तपासणी करण्यासाठी, जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्याचे पूर्ण अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील. या समितीमध्ये फक्त शासकीय अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा. जिल्हा परिषद गटामधील प्रथम क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतीची या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-२" मध्ये नमूद केलेल्या निकषाप्रमाणे, या समितीने काटेकोरपणे तपासणी करावी व जिल्हा स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी ग्रामपंचायतींची निवड करून, याबाबतचा अहवाल दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करावा. सदरचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी

विभागीय आयुक्त यांना दिनांक ०१ मार्च, २०२० पर्यंत सादर करावा. जिल्हा स्तरावरील फक्त प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती ह्या विभाग स्तर स्पर्धेकरिता पात्र असतील.

जिल्हा परिषद गट स्तर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आलेल्या ग्रामपंचायती, जिल्हा परिषद गट स्तर स्पर्धेमध्ये निवड केलेला उत्कृष्ट सफाई कामगार, जिल्हा स्तर स्पर्धेमध्ये निवड केलेला उत्कृष्ट सफाई कामगार, परिच्छेद-६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा स्तरावरील विशेष पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती व जिल्हा स्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतींचा, एकत्रित पुरस्कार वितरण कार्यक्रम, जिल्हा स्तरावर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आयोजित करावा. या कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषद गट स्पर्धेमधून प्रथम क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक यांना प्रमाणपत्र देवून, त्यांचा यथोचित सत्कार करावा. प्रशस्तीपत्रकाचा नमुना परिशिष्ट ४ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

<u>विभाग स्तर स्पर्धा</u> :-

x) **<u>विभागीय आयुक्त स्तरावरील तपासणी दिनांक ०१ मार्च,२०२० ते ३१ मार्च, २०२०</u> :-**

जिल्हा स्तरावरील प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींची तपासणी करण्यासाठी, समिती गठीत करण्याचे पूर्ण अधिकार, विभागीय आयुक्त यांना राहतील. या समितीमध्ये फक्त शासकीय अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा. जिल्हा स्तरावरील प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींची, या शासन निर्णयासोबतच्या " परिशिष्ट- २" मध्ये नमूद केलेल्या निकषाप्रमाणे या समितीने तपासणी करावी व विभागस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी ग्रामपंचायतींची निवड करून, याबाबतचा अहवाल दिनांक १० एप्रिल, २०२० पर्यंत शासनास सादर करावा. विभाग स्तरावरील फक्त प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती ह्या राज्यस्तर स्पर्धेकरिता पात्र असतील.

xi) **<u>विभाग स्तरावरील सत्कार सोहळा-दिनांक १० एप्रिल,२०२० ते १५ एप्रिल,२०२० :-</u>**

परिच्छेद-६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विभाग स्तरावरील विशेष पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती, विभाग स्तर स्पर्धेमध्ये निवड केलेला उत्कृष्ट सफाई कामगार व विभाग स्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतीचा पुरस्कार वितरण कार्यक्रम, विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली विभागस्तरावर आयोजित करावा.

xii) **<u>राज्यस्तरीय तपासणी- दिनांक १६ एप्रिल,२०२० ते ३१ मे, २०२०</u> :-**

विभाग स्तरावरील प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त सर्व ग्रामपंचायतींची, या शासन निर्णयासोबतच्या " परिशिष्ट- २" मध्ये नमूद केलेल्या निकषाप्रमाणे, राज्यस्तरीय तपासणी समितीने तपासणी करावी व सर्व ग्रामपंचायतींचा एकत्रित मुल्यांकन अहवाल, अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांना दिनांक १५ जून, २०२० पर्यंत सादर करावा.

राज्यस्तरीय तपासणी समिती पुढीलप्रमाणे असेल:-

उप सचिव व प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय	अध्यक्ष
अवर सचिव (पापु-१६), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय	सदस्य -सचिव
संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई	सदस्य
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय मधील एक कक्ष अधिकारी	सदस्य

xiii) अंतिम निवड -दिनांक १५ जून,२०२० ते ३१ जुलै, २०२० : -

राज्यस्तरीय तपासणी समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, आवश्यकता वाटल्यास प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतीला युनिसेफ व इतर संबधित अधिकारी यांच्यासह भेट देवून अंतिम निकाल घोषित करतील.

xiv) पुरस्कार वितरण समारंभ -दिनांक २ ऑक्टोबर २०२०: -

परिच्छेद-६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य स्तरावरील विशेष पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती, राज्य स्तर स्पर्धेमध्ये निवड केलेला उत्कृष्ट सफाई कामगार, व राज्य स्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायतीचा पुरस्कार वितरण कार्यक्रम, मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखाली राज्य स्तरावर आयोजित करावा. राज्यस्तरावरील पुरस्कार वितरण समारंभाचे, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो), बेलापूर यांनी आयोजन करावे.

४. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे नियम :-

i) प्रत्येक स्तरावरील तपासणी समित्यांनी, त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींची तपासणी कधी व किती कालावधीत केली याची नोंद ग्रामपंचायतींच्या शेरेबुकात करावी.

ii) तपासणी समितीच्या प्रत्येक सदस्याने काटेकोरपणे तपासणी करून, मुल्यांकन नि:पक्षपातीपणे करावे. प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीने, त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये तपासणीअंती गुणपत्रिका तयार करावी व सर्व सदस्यांनी गुणपत्रिकेवर स्वाक्षरी करावी.

iii) तपासणी समितीने, तपासणीच्या कालावधीपर्यंत, प्रत्येक ग्रामपंचायतीने केलेल्या कामांचे अभिलेखे विचारात घेवून मुल्यांकन करावे.

iv) प्रत्येक स्तरावरील समितीने दिलेला निर्णय हा **अंतिम** राहील.

v) राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीला, पुढील ५ वर्षे या अभियानांतर्गत भाग घेता येणार नाही. तथापि राज्यस्तरावरील द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींला या अभियानांतर्गत दर्जा उंचावण्यासाठी त्यापुढील ५ वर्षामधील फक्त दोन स्पर्धांमध्ये भाग घेता येईल.

vi) या अभियानास जनतेचा प्रतिसाद व लोकसहभाग कायम रहावा किंबहुना आणखी वाढावा तसेच स्वच्छतेस/विकास कामास आलेली गती कायम रहावी, यास्तव ग्रामपंचायतींनी केलेल्या कामाचे मुल्यांकन नि:पक्षपातीपणे होणे आवश्यक आहे. यासंदर्भात प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीतील अधिकारी व पदाधिकारी यांची जबाबदारी महत्वाची आहे. त्यामुळे तपासणी समितीमधील, प्रत्येक सदस्यांनी तपासणीवेळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये समितीमधील किमान २/३ (दोन-तृतीयांश) सदस्यांकडून तपासणी करण्याचा अधिकार समिती अध्यक्षांस असेल.

vii) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेमध्ये, जर दोन किंवा त्यापेक्षा जास्त ग्रामपंचायतींना, समसमान गुण प्राप्त झाले तर अशावेळी या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट २** मध्ये नमूद केलेल्या घटकांपैकी, **सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन व शौचालय व्यवस्थापन** या घटकांमध्ये ज्या ग्रामपंचायतीला जास्त एकूण गुण प्राप्त झाले असतील, त्या ग्रामपंचायतीला वरचा क्रमांक देण्यात यावा.

viii) प्रत्येक ग्रामपंचायतीने या अभियानांतर्गत **"उत्कृष्ट प्रभाग "**स्पर्धा**,** जिल्हा परिषद गट स्पर्धा, जिल्हा स्तर, विभाग स्तर व राज्य स्तर, अशा वेगवेगळ्या स्तरावरून प्राप्त होणा-या बक्षिसांच्या रकमांचा विनियोग स्वच्छतेशी निगडीत उपक्रमांवर करावा तसेच स्वच्छतेच्या अनुषंगाने, ज्या सफाई कामगारांनी उत्कृष्ट काम केले आहे, अशा उत्कृष्ट सफाई कामगारांची निवड करण्यात येवून, स्पर्धेमध्ये प्राप्त होणा-या पुरस्काराच्या रकमेपैकी खालील कोष्टकामध्ये नमूद केलेल्या रकमेच्या मर्यादेमध्ये रक्कम खर्च करावी. एखाद्या ग्रामपंचायतीमध्ये एकापेक्षा जास्त सफाई कामगारांची उत्कृष्ट सफाई कामगार म्हणून निवड केल्यास खालील कोष्टकातील स्तंभ २ मध्ये नमूद केलेली रक्कम निवड केलेल्या सफाई कामगारांमध्ये विभागून द्यावी.

पुरस्कार स्तर	उत्कृष्ट सफाई कामगारांना द्यावयाची रोख रक्कम	सफाई कामगारांच्या आरोग्य संबधी बाबींवर खर्च
जिल्हा परिषद गट स्तर	रूपये २५००/-	रूपये २५००/-
जिल्हा स्तर	रूपये ५०००/-	रूपये ५०००/-
विभाग स्तर	रूपये ७५००/-	रूपये ७५००/-
राज्य स्तर	रूपये १०,०००/-	रूपये १०,०००/-

५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धांतर्गत पुरस्कारांच्या रकमा :-

या स्पर्धेअंतर्गत ग्रामपंचायतींना प्राप्त होणा-या प्रत्येक स्तरावरील पुरस्कारांच्या रक्कमा खालीलप्रमाणे आहेत:-

क्र.	पुरस्कार स्तर	पुरस्कार रक्कम		
		प्रथम	द्वितीय	तृतीय
१	उत्कृष्ट प्रभाग	रू. १०,०००/-	--	--
२	जिल्हा परिषद गट	रू. ५०,०००/-	--	--
३	जिल्हास्तर	रू. ५ लक्ष	रू. ३ लक्ष	रू. २ लक्ष
४	विभागस्तर	रू. १० लक्ष	रू. ८ लक्ष	रू. ६ लक्ष
५	राज्यस्तर	रू. ४० लक्ष	रू. २५ लक्ष	रू. २० लक्ष

६. विशेष पुरस्कार :-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धातंर्गत द्यावयाच्या पारितोषिकासाठी निवडलेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर द्यावयाच्या विशेष पुरस्कारासाठी, अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धातंर्गत द्यावयाच्या पारितोषिकासाठी निवडलेल्या ग्रामपंचायतीव्यतिरिक्त उर्वरित ग्रामपंचायतीमधून विशेष पुरस्कार द्यावयाच्या ग्रामपंचायतींची निवड करण्यात येईल. जिल्हा स्तर, विभाग स्तर व राज्य स्तरावर विशेष पुरस्कार प्राप्त करणाऱ्या ग्रामपंचायतींना, त्या त्या स्तरावरील आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमामध्ये विशेष पुरस्कार प्रदान करण्यात यावा.

या तीन विशेष पुरस्कारांसाठी निवड प्रक्रिया त्या त्या स्तरावरील निवड समित्यामार्फत खालील मुद्दे विचारात घेवून करण्यात येईल.

क्र.	पुरस्काराचे नाव	निवडीचे निकष	बक्षिस रक्कम	
१.	स्व. वसंतराव नाईक पुरस्कार- सांडपाणी व्यवस्थापन.	शासन निर्णयातील परिशिष्ट-२ मधील अ. क्र. (४) मधील एकूण २५ गुणांपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत.	जिल्हा स्तर	२५,०००/-
			विभाग स्तर	३०,०००/-
			राज्य स्तर	२,००,०००/-
२.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार- पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन.	शासन निर्णयातील परिशिष्ट-२ मधील अ.क्र. (१) मधील एकूण ५० गुणांपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत.	जिल्हा स्तर	२५,०००/-
			विभाग स्तर	३०,०००/-
			राज्य स्तर	२,००,०००/-
३.	स्व.आबासाहेब खेडकर पुरस्कार - शौचालय व्यवस्थापन	शासन निर्णयातील परिशिष्ट-२ मधील अ.क्र. (२) (x) मधील एकूण १३ गुणांपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत.	जिल्हा स्तर	२५,०००/-
			विभाग स्तर	३०,०००/-
			राज्य स्तर	२,००,०००/-

उपरोक्त तीन विशेष पुरस्कारांकरिता जर दोन किंवा त्यापेक्षा जास्त ग्रामपंचायतींना, समसमान गुण प्राप्त झाले तर अशावेळी सन २०११ च्या जनगणनेनुसार ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या जास्त असेल, त्या ग्रामपंचायतीला वरचा क्रमांक देण्यात यावा.

७. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती व स्वच्छ जिल्हा परिषद स्पर्धा :-

अ) राज्यस्तरावरून राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती निवड करण्याकरिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

i) गट विकास अधिकारी यांनी, पंचायत समितीच्या अखत्यारितील सर्व ग्रामपंचायतींना **परिशिष्ट २** प्रमाणे मिळालेल्या एकूण गुणांच्या ६० % गुण विचारात घेवून, त्यास ग्रामपंचायतींच्या एकूण संख्येने भागून येणारे गुण विचारात घ्यावेत.

II) गट विकास अधिकारी यांनी खालील परिच्छेद क्रमांक ८ (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पंचायत समिती स्तरावरील गुण परिगणित करण्यात यावेत.

III) गट विकास अधिकारी यांनी उपरोक्त **i) व ii)** येथील एकूण गुणांसह, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्याकडे अहवाल सादर करावा.

IV) उपरोक्त iii) प्रमाणे जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील पंचायत समित्यांपैकी, सर्वात जास्त गुण प्राप्त करणा-या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या पंचायत समित्यांच्या गुणांकनासंदर्भातील पंचायत समिती निहाय अहवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करावा.

ब) राज्यस्तरावरून राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्वच्छ पंचायत समिती व स्वच्छ जिल्हा परिषदेची निवड करण्याकरिता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

i) उपरोक्त (**अ**) (iii) प्रमाणे सर्व पंचायत समितींनी प्राप्त केलेल्या एकूण गुणांस पंचायत समितींच्या एकूण संख्येने भागून येणारे गुण विचारात घ्यावेत.

ii) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, खालील परिच्छेद क्रमांक ८ **(आ)** मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पंचायत समिती स्तरावरून गुण परिगणित करण्यात यावेत.

iii) **" स्वच्छ जिल्हा परिषद "** निवडीकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त (i) **व** (ii) ची बेरीज करून विभागीय आयुक्त यांना अहवाल सादर करावा.

iv) **"स्वच्छ पंचायत समिती "** निवडीकरिता उपरोक्त **परिच्छेद ७ (अ)** (iii) प्रमाणे जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील पंचायत समित्यांपैकी सर्वात जास्त गुण प्राप्त करणा-या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या पंचायत समित्यांच्या गुणांकनासंदर्भातील पंचायत समिती निहाय अहवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करावा.

क) विभाग स्तर

i) प्रत्येक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, विभागीय आयुक्तांनी त्यांच्या नियंत्रणाखालील पंचायत समित्यांपैकी सर्वात जास्त गुण प्राप्त करणा-या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या पंचायत समित्या व जिल्हा परिषदांपैकी सर्वात जास्त गुण प्राप्त करणा-या प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या जिल्हा परिषदांच्या गुणांकनासंदर्भातील, अहवाल शासनास सादर करावा.

ड) राज्य स्तर

प्रत्येक विभागामधून प्राप्त होणा-या तीन पंचायत समिती व दोन जिल्हा परिषदा अशा प्रकारे संपुर्ण राज्यातून प्राप्त होणा-या पंचायत समिती व जिल्हा परिषदांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय “स्वच्छ पंचायत समिती ” व “स्वच्छ जिल्हा परिषदांची” राज्यस्तरावरून निवड करण्यात येईल.

८. राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा व पंचायत समिती स्पर्धा गुणांकन व निकष:-

अ) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समितीच्या निवडी करिता खालील कोष्टकामध्ये नमूद केल्याप्रमाणे, पंचायत समितीमधील सर्व ग्रामपंचायतींची संख्या विचारात घेण्यात येवून,गुणांची परिगणना करण्यात यावी. खालील सर्व बाबींकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा कालावधी विचारात घेण्यात यावा:-

क्र	विषय	निकष	गुण	एकूण
१	**बंद असलेल्या** पाणी पुरवठा योजनांची टक्केवारी	एकूण संख्येपैकी १ % पेक्षा कमी असल्यास	१०	१०
		१ ते २ % असल्यास	५	
		२ %पेक्षा जास्त असल्यास	०	
२	पाणी पट्टीच्या उत्पन्नातून काही रक्कम योजनेच्या विशेष दुरुस्तीसाठी अन्य खात्यामध्ये जमा केली असल्यास.	एकूण योजनांच्या संख्येपैकी २५ % वा त्यापेक्षा जास्त	५	५
		२५ % पेक्षा कमी असल्यास	०	
३	पाणी पुरवठा योजनेच्या पाण्याच्या नमुन्यांची संख्या व तपासणीअंती पाणी पिण्यास अयोग्य असल्याबाबत प्राप्त झालेला प्रयोगशाळेचा अहवाल	एकूण नमुन्यांच्या संख्येपैकी १०% वा त्यापेक्षा कमी प्रमाणात असल्यास	१०	१०
		१० % पेक्षा जास्त असल्यास	०	
४	शाश्वत स्वच्छता आराखडयानुसार पंचायत समिती क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीमधील शौचालय नसलेल्या कुटुंबांचे ग्रामपंचायतीमधील सर्व कुटुंबांशी असलेली टक्केवारी (**शाश्वत**	एकूण कुटुंबांच्या संख्येपैकी ५% पेक्षा कमी कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय नसल्यास	१०	१०
		५% वा त्यापेक्षा अधिक असल्यास	०	

क्र	विषय	निकष	गुण	एकूण
	स्वच्छता आराखडा तयार केला नसल्यास गुण मिळणार नाहीत.)			
५	गोबरधन योजनेच्या प्रगतीबाबत	योजनेसंदर्भातील कागदपत्रांच्या तपासणीअंती कारणमिमांसेसह गुणांकन देण्यात यावेत.	५	५
एकूण			४०	४०

आ) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषदेच्या निवडी करिता खालील कोष्टकामध्ये नमूद केल्याप्रमाणे, जिल्ह्यामधील सर्व ग्रामपंचायतींची संख्या विचारात घेण्यात येवून , गुणांची परिगणना करण्यात यावी. खालील सर्व बाबींकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा कालावधी विचारात घेण्यात यावा:-

क्र.	विषय	कमाल गुण
१	**वैयक्तिक शौचालय अनुदान वाटप- (एकूण गुण-७)**	७
